454

महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दि.०२/१२/२०२४

परिपत्रक —

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन,गृह विभाग, निर्णय क्र.संकिर्ण १२२३/६४२९२२६/प्र.क्र.११३१/पोल-५ब, दिनांक २९ नोव्हेंबर-२०२४.

**विषय :-** पोलीस अधिक्षक कार्यालय,अहमदनगर यांच्या अधिनस्त पोलीस हवालदार संवर्गात एक अधिसंख्य पद निर्माण करण्याबाबत.
श्री.निळकंठ लक्ष्मण जगताप पोलीस हवालदार.

******

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, क्र.संकिर्ण १२२३/६४२९२२६/प्र.क्र.११३१/पोल-५ब, दिनांक २९ नोव्हेंबर-२०२४.ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४११२९१२५५५८३९२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता

प्रति,

पोलीस अधिक्षक, अहमदनगर
कार्यासन अधिकारी, का.क्र.६-

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "आस्थापना" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**पोलीस अधिक्षक कार्यालय, अहमदनगर, यांच्या अधिनस्त पोलीस हवालदार संवर्गात एक अधिसंख्य पद निर्माण करण्याबाबत...**
**श्री. निळकंठ लक्ष्मण जगताप, पोलीस हवालदार**

# महाराष्ट्र शासन

## गृह विभाग

**शासन निर्णय क्रमांक संकीर्ण १२२३/६४२९२२६/प्र.क्र.११३१/पोल-५ब,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक - २९ नोव्हेंबर २०२४.

वाचा :- १) पोलीस महासंचालक यांचे उप सहायक (आस्थापना),पोलीस महासंचालक, कार्यालय यांचा दिनांक ३०.११.२०२३ व २७.३.२०२४ रोजीचा प्रस्ताव.

२) दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील कलम २०(४).

३) सिव्हिल सर्जन, जनरल हॉस्पिटल, अहमदनगर यांचे दिनांक २६.०८.२०२१ रोजीचे प्रमाणपत्र.

४) वित्त विभागाच्या उच्चस्तरीय सचिव समितीच्या दि. ०८.१०.२०२४ रोजीच्या बैठकीचे दि.०९.१०.२०२४ रोजीचे इतिवृत्त.

**प्रस्तावना :**

श्री. निळकंठ लक्ष्मण जगताप, पोलीस हवालदार/१३५८, हे शासन सेवेत दि.२३.११.१९९४ रोजी रुजू झाले आहेत. श्री. जगताप हे शासन सेवेत कार्यरत असताना दि. १९.०४.२०२० रोजी झालेल्या अपघातामुळे त्यांना अपंगत्व आले. सिव्हिल सर्जन, जनरल हॉस्पिटल, अहमदनगर यांनी श्री.जगताप हे ७० टक्के अपंग असल्याचे प्रमाणित केले आहे. श्री. जगताप हे नियतवयोमानानुसार दि.३०.०४.२०३१ रोजी सेवानिवृत्त होणार आहेत. श्री. जगताप यांना कायमचे अंपगत्व आल्यामुळे, त्यांच्यासाठी अधिसंख्य पद निर्माण करण्यासंदर्भातील प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय-:**

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील कलम २० (४) मधील तरतूदीनुसार, श्री. निळकंठ जगताप, पोलीस हवालदार, पोलीस अधीक्षक कार्यालय, अहमदनगर हे काम करण्यास सक्षम होत नाहीत तो पर्यंत किंवा सेवानिवृत्तीच्या वयापर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत पोलीस हवालदार या संवर्गाचे एक अधिसंख्य पद गृह विभागांतर्गत निर्माण करण्यास उच्चस्तरीय सचिव समितीने दि.०८.१०.२०२४ च्या बैठकीमध्ये मान्यता दिली आहे.

प्रस्तुत मान्यतेनुसार, श्री. निळकंठ लक्ष्मण जगताप, पोलीस हवालदार/१३५८ यांचे एस-९ (२६४००-८३६००) या वेतनश्रेणीतील वेतन काढण्यासाठी पोलीस अधीक्षक कार्यालय, अहमदनगर यांचे अधिनस्त पोलीस हवालदार संवर्गातील एक अधिसंख्य पद दिनांक १९.०४.२०२० पासून निर्माण करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर अधिसंख्य पद पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवर निर्माण करण्यात येत आहे.

३. सदर अधिसंख्य पद हे श्री. जगताप हे काम करण्यास सक्षम होत नाहीत तो पर्यंत किंवा सेवानिवृत्तीच्या वयापर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंतच्या कालावधीसाठी निर्माण करण्यात येत आहे. त्यानंतर सदर पद आपोआप संपुष्टात येईल.

४. सदर पदाच्या वेतन व भत्त्यावरील खर्च हा " मागणी क्रमांक-बी-१, मुख्यलेखाशीर्ष २०५५-पोलीस उपलेखाशिर्ष-१०८, राज्य मुख्यालय पोलीस(०२) शहर पोलीस(०२)(०१)शहर पोलीस आस्थापना २०५५००९७-०१(वेतन) " या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग व सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ६७५/२०२४ आपुक, दिनांक २६.११.२०२४ अनुसार व उच्च स्तरीय सचिव समितीच्या दिनांक ०८.१०.२०२४ रोजी संपन्न झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२४११२९१२५५५८३९२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

YOGITA SHRIDHAR MALAP

Digitally signed by YOGITA SHRIDHAR MALAP
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=b7742e8c5c015004bf8a11faf904d3994f1e6c348083fb8212c050bb37fc1382, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C574CC6DF7C7AE23D7188E1018C0E41F16D862FFE8E2E4B4A4B08923E9BDF7A7, cn=YOGITA SHRIDHAR MALAP
Date: 2024.11.29 12:58:14 +05'30'

**( योगिता मालप )**

**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,

२.महालेखापाल,(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य मुंबई/ नागपूर.

३.महालेखापाल ( लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य,मुंबई/नागपूर.

४. पोलीस अधीक्षक, अहमदनगर

५.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

६.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.

७. जिल्हा कोषागार अधिकारी, अहमदनगर.

६.वित्त विभाग, आ.पु.क. कक्ष मंत्रालय,मुंबई.

७.सामाजिक न्याय व विशेषसहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

८.निवडनस्ती, पोल ५-ब, गृह विभाग, मंत्रालय मुंबई-३२.